# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४,

Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

**EPABX:** 0253-2539100-300, **Phone:** 0253-2539170, 173

**Website :** www.muhs.ac.in, **E-mail :** sw@muhs.ac.in

MUHS

**डॉ. मनोजकुमार बी.मोरे**
एम.डी. (आयुर्वेद)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr.Manojkumar B. More**
**M.D. (Ayurved)**
**Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/ ४९ /२०२२ — दि. ०६ /०९/२०२२

प्रति,

मा. अधिष्ठाता/प्राचार्य

श्री यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे
यशवंत परिचर्या महाविद्यालय
मु.पो. कोडोली, ता. पन्हाळा
जि. कोल्हापुर - ४१६११४

विषय : कमवा व शिका योजनेचे अनुदान आर.टी.जी.एस. केल्याबाबत....

संदर्भ : मआविवि/एसडब्ल्यु/स्कीम/६८२/२०२२ दि.०१/०६/२०२२

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी विद्यापीठाने लागू केलेली कमवा व शिका योजनेसाठीचे प्रस्ताव विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून मागविण्यात आले आहेत. सदर प्रस्तावांची छाननी केल्यानंतर योजनेच्या अटी, शर्ती व निकषांनुसार योजनेचे अनुदान, प्रति विद्यार्थी रु.१६,०००/- इतकी रक्कम मिळणेसाठी खालील नमुद केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पात्र ठरले आहेत. **यापूर्वी संदर्भीय परिपत्रकानूसार पाठविण्यात आलेल्या व नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, महाविद्यालयाने सुट्टीचे दिवस वगळता प्रत्येक दिवशी फक्त दोनच तास निवडक स्वरुपाची कामे विद्यार्थ्यांना देण्यात यावी,** व त्या मोबदल्यात विद्यापीठातर्फे रु. ५०/- प्रती तास या दराने मेहनताना अदा करण्यात यावा. त्यासाठी खालील नमुद केल्याप्रमाणे..05.. विद्यार्थ्यांकरीता व ऑडीट फी रु. ५००/- असे विद्यापीठाचे एकत्रित अनुदान म्हणून रु..(0,500......./- इतकी महाविद्यालयाच्या बचत खात्यात दि. 08 / 09 /२०२२ रोजी आर.टी.जी.एस. करण्यात आली आहे.

लाभार्थी विद्यार्थी :
१) भडके वैष्णवी आबासाहेब
२) नाईक तनुजा रणजीत
३) थेलपले स्वप्नाली सुनिल
४) गायकवाड श्रद्धा भिमराव
५) नाडे प्रितीका सुनिल

Satish Iglue Sir / BANK / forward To manual
[illegible]

... COLLEGE OF NURSING, KODOLI
IN WARD / OUT WARD NO 444
FILE NO. MUHS Incoming
DATE 17/01/2023

Sem Mr. Ingale Sir

YASHWANT AYURVEDIC COLLEGE, KODOLI
INWARD OUTWARD NO. 35
FILE NO ... 17/1/23

ई) लाभार्थी विद्यार्थ्याला महिन्यातील जास्तीत जास्त २० दिवस अशाप्रकारे वर्षातील जास्तीत जास्त ०८ महिने काम दयावे. त्यामुळे विद्यार्थ्याला (रु.५० प्रती तास प्रमाणे) कमाल रु. १६,०००/- प्रती वर्ष एवढीच रक्कम विद्यापीठातर्फे अदा करता येईल याची नोंद घ्यावी. **(रु ५०×२ तास ×२० दिवस =रु. २,०००/- दरमहा ×०८ महिने = १६,०००/-)** कमवा व शिका योजनेचा लाभ अंत्यत गरीब व गरजु विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी मा. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी योजनेचे नियमित संनियंत्रण ( Regular Monitoring ) करणे आवश्यक आहे व विद्यापीठाच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही. याची कृपया नोंद घ्यावयाची आहे.

तसेच आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच उलट टपाली देण्यात यावी व योजनेबाबतच्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करावे. **सदर पत्राची प्रत संबधीत विद्यार्थ्यांस देण्यात यावी**. ही विनंती.

धन्यवाद **!**

**संचालक**
**विद्यार्थी कल्याण विभाग**

**(टिप :** सदर योजनेचा आठ महिन्याच्या कालावधी संपल्यानंतर **दि.** १५ / १२ /२०२३ पर्यत योजनेचे समायोजन करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.)

**सोबत :** १) सनदी लेखापालांचे उपयोगिता प्रमाणपत्राची नमुना प्रत.
२) हजेरीपत्रकाची नमुना प्रत.
३) जमा व खर्चाचा हिशोब.

माहितीस्तव प्रत : महाविद्यालयाने सदर पत्राच्या छायांकीत प्रती लाभार्थी विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.